## कर्मचा-याचा वारसाला अंशदान परत करण्यासाठी द्यावी लागणारी कागदपत्रे

१. कर्मचा-याचा वारस पत्नीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नावाने वैयक्तिक रक्कम मागणी अर्ज करावा.

२. कर्मचा-याचा वारस पत्नीचे १०० रु. चे स्टॅम्प पेपरवर पेन्शन ऐवजी रककम परत चे हमीपत्र अॅफ़ेडेव्हीट किंवा नोटरी करुन पाठवावे . (हमीपत्राचा नमुना खाली दिलेला आहे.)

३. वारसाहक्क प्रमाणपत्राची प्रत

४. कर्मचा-याचा मृत्यु दाखला

५. कर्मचा-याचे वारस पत्नी यांचे बॅकेचे खाते क्रमांक व नाव , बॅकेचे नाव , बॅक शाखेचे नाव , बॅकेचा आय एफ़ एस सी कोड क्रमांक इ. माहिती असलेली बॅकेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत बॅकेचे आर टी जी एस करण्याकरीता द्यावी. ( शक्यतो एसबीआय बॅक असल्यास चांगले इतर हि बॅक चालेल.)

६ . कर्मचा-याचा वारसाचे ओळखपत्र म्हणुन पॅनकार्ड / मतदान कार्ड / आधार कार्ड यापैकी १ द्यावे.

७. कर्मचा-याचा मोबाईल क्रमांक

८. कर्मचा-याचा वारसाचा फ़ोटो व नमुना सही बाजार समिती लेटर पॅडवर सचिवांनी प्रमाणित करुन पाठवावी.

९. बाजार समितीचे अंशदान परत करणे बाबत शिफ़ारस पत्र.

वरील सर्व कागदपत्रे तयार करुन बाजार समिती मार्फ़त पाठविण्यात यावीत.

# प्रतिज्ञापत्र

हमीपत्र लिहुन देते की , मी श्रीमती ............................................... राहणार .................... मी कै. ........................ मयत कर्मचारी कृषि उत्पन्न बाजार समिती ............................. जि . ..................... यांची वारसदार असुन योजनेमार्फ़त मिळणा-या कुटुंब सेवानिवृत्ती वेतनास मी पात्र आहे. माझ्या पतीच्या भविष्य निर्वाह निधीच्या मालकी हिश्श्याची रक्कम सदरहू बाजार समितीने योजनेकडे वेळोवेळी वर्ग केलेली आहे.

मी योजनेच्या नियमानुसार व निकषांनुसार कुटुंब सेवानिवृत्ती वेतन मिळण्यास पात्र आहे. तथापि माझ्या वैयक्तिक घरगुती अडचणीमुळे मला योजनेकडे जमा असलेली रक्कम कुटुंब सेवानिवृत्ती वेतन न घेता एक रकमी परत घ्यावयाची आहे. प्रस्तुतचा निर्णय हा मी माझे अक्कलहुशारीने समजुन - उमजुन , कोणाच्याही दबावाला बळी न पडता अथवा कसल्याही प्रकारचे नशापान न करता घेतलेला आहे व तो माझे वाली वारसांना बंधनकारक आहे व राहील.

तसेच मी घेतलेल्या या निर्णयामुळे योजनेकडे जमा असलेली सर्व रक्कम मला परत मिळाल्यास भविष्य काळात मी व माझे वालीवारस सेवानिवृत्ती वेतन व अन्य कसल्याही सेवा सवलती मागणार नाही. तसेच त्याबाबत कुठलीही कसल्याही प्रकारची तक्रार अथवा कोर्टाचा विषय करणार नाही. म्हणुन प्रस्तुतचे हमीपत्र आज रोजी ........................ मुक्कामी लिहुन देऊन त्यावर स्वाक्षरी करत आहे.

तारीख

श्रीमती ...................................

हमीपत्र लिहुन देणार

(टिप :- सदर नमुन्यात रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर अॅफ़ेडेव्हीट करुन पाठविण्यात यावे .)